मानव्यविद्या शाखा

(*) सुधारित अभ्यासक्रम - २०२०-२०२१ (४) १९ ७ २०२०

एस वाय बीए - इतिहास (क्रेडिट सिस्टीम)

कोर्स (डी एस ई - १ - क्रेडीट - ०३

सेमिस्टर - तिसरे · मध्ययुगीन भारत -

सुलतानशाही कालखंड / सल्तनत कालवधी

युनिट / घटक - १ Unit - 1 दिल्ली सल्तनतांची स्थापना - १०

अ - सल्तनत कालखंडातील - हिस्टोरीओग्राफीचे स्त्रोत.. - १० (इतिहास लेखनातील साधने)

ब - मुहम्मद घोरी यांचे हल्ले.

क - दिल्ली सल्तनची स्थापना : कुतुबुद्दीन - ऐबक.

युनिट - २ · दिल्लीचे सुरुवातीच्या सुलतान आणि त्यांचे योगदान - १०

अ - इल्तुमिश / अल्तमश

ब - राझिया.

क - बल्बन

युनिट तिसरा (3) · सल्तनत चा विस्तार - १५

(अ) - अल्लाउद्दीन खिलजी : विस्तार व प्रशासकीय - सुधारणा.

(ब) मुहम्मद - बिन - तुघलक यांचे प्रयोग.

फिरोजशहा तुघलक : प्रशासकीय सुधारणा

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

Date १८ ७ 2020

(क) सय्यद, लोदी आणि सत्तांची अधोगति
(सुलतानशाहीचा-ऱ्हास)

युनिट - ४. विजयनगर व बहामनी राज्ये (१०)

(अ). विजयनगर साम्राज्याचा उदय :
हरिहर, बुक्का, कृष्णदेवराय

(ब) बहामनी साम्राज्याचा उदय विस्तार.
महमूद गवानचे योगदान.

(क) बहामनी साम्राज्याचे विभाजन

Scanned with CamScanner

युनिट-१ दिल्ली सल्तनाची स्थापना - ③

Date 9८ ७ 2020

युनिट-१ दिल्ली सल्तनत स्थापना — ⑩
(दिल्ली सुलतानशाहीची स्थापना)
↓

पार्श्वभूमी :- अति प्राचीन काळापासून १२व्या (बाराव्या) शतकापर्यंतचा काळ 'प्राचीन भारत' या नावाने ओळखला जातो. बाराव्या (१२) शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा काळ 'मध्ययुगीन काळ' म्हणून ओळखला जातो. [ढोबळमानाने ८ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतच्या कालखंडाला भारताचे मध्ययुग संबोधले जाते.] मध्ययुगात पूर्वमध्यकाळ १२व्या शतकापासून १६व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत आणि उत्तरमध्य काळ - १६ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत असे दोन विभाग पडतात.

पूर्वमध्यकाळालाच 'सुलतानशाहीचा काळ' आणि उत्तरमध्यकाळाला 'मधुल (मगोल) काळ' या नावाने इतिहासात ओळखले जाते. या युनिट मध्ये सुलतानशाहीची स्थापना (सल्तनतची स्थापना) यावर अभ्यास करणार आहोत.

(अ) सल्तनत कालखंडातील इतिहास लेखनाची साधने (हिस्टोरीग्राफीचे स्त्रोत)
(ब). मुहम्मद घोरीयांचे हल्ले. (हल्ले)
(क) दिल्ली सल्तनची स्थापना.

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

(ओ) सल्तनत कालखंडातील हिस्टोरिओग्राफीचे स्त्रोत. [दिल्ली सुलतानशाहीच्या इतिहासाची साधने] —

* प्रस्ताविक :- इतिहास लेखन शास्त्रानुसार कोणताही इतिहास पुराव्या अभावी लिहिता येत नाही. त्यासाठी लिखित व अलिखित ऐतिहासिक ऐतिहासिक साधनांची आवश्यकता असते. शासकीय पत्रे, राज्यकर्त्यांची रोजनीशी, ऐतिहासिक ग्रंथ, परकीय प्रवाशांची प्रवास वर्णन या साधनांचा उपयोग मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी होतो. बाराव्या शतकापर्यंत हिंदू ग्रंथांची ग्रंथकारांनी भरपूर प्रमाणात साहित्य निर्मिती केली परंतु त्यानंतरच्या काळात मात्र साहित्य निर्मितीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मध्ययुगीन भारताचा इतिहास समजण्यासाठी हिंदू ग्रंथांची मदत होऊ शकत नाही. या कालखंडात हिंदू इतिहासकारांनी इतिहास लिहिण्याकडे दुर्लक्ष केले असलेतरी मुस्लिम इतिहासकारांनी मात्र भरपूर प्रमाणात ग्रंथ निर्मिती केली. परंतु त्यांच्या ग्रंथात एकांगीपणा आढळतो. काव्यात्मकता व धार्मिक पक्षपात हे दोषही त्यांच्या लिखाणात आढळतात.

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

मध्ययुगिन भारताच्या इतिहासाची माहिती देणारे ग्रंथ फारसी व अरबी भाषेत लिहिले गेले या ग्रंथाचे लेखक परकीय असून ते सुलतानाच्या दरबारात - इतिहासकार होते. त्यांना सामान्य लोकांच्या जीवनात रस नव्हता. तसेच शास्त्रशुद्ध इतिहास कसा लिहावा याविषयी सुद्धा त्यांना माहिती नव्हती. त्यामुळे त्यांचे लेखन सुलतानांची स्तुती, राजदरबारातील कट-कारस्थाने व विलासी जीवन या भोवतीच घुटमळत राहिले. सुलतानशाहीच्या इतिहासाची माहिती देणारे ग्रंथ पुढीलप्रमाणे -

① चचनामा - चचनामा हा सुलतानशाहीच्या इतिहासाचे एक महत्वाचे साधन आहे. या ग्रंथात महमद-बीन-कासिमच्या पूर्वीचा व नंतरच्या काळातील सिंध प्रांतातील इतिहास रेखाटला आहे हा ग्रंथ अरबी भाषेत लिहिलेला असून त्याचे फारसी भाषेत भाषान्तर करण्यात आलेले आहे.

② तारीख-उल-हिंद - अलबेरूनी विदेशी असून त्याने महम्मद गझनीच्या दरबारात नोकरी केली. त्याने तारीख-उल-हिंद या ग्रंथाची रचना केली असून त्यास अरबी आणी फारसी भाषेचे सखोल ज्ञान होते. महम्मद गझनीने भारतावर केलेले

What makes you happy?
# HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

आक्रमण हिंदू धर्म व साहित्याचे सविस्तर वर्णन या ग्रंथात सापडते.

⊛ (3) ताजुल मासिर :- महम्मद घोरी सोबत हसन निझामी हा भारतात आला होता. त्यानेच हा ग्रंथ लिहिला. इ.स 1192 पासून इ. स. 1225 पर्यंतच्या इतिहासाची माहिती या ग्रंथात आढळते.
तसेच मनोरंजनाची विविध साधने आणि महत्त्वाच्या ठिकाणांचीही माहिती या ग्रंथावरून होते. सुलतानशाहीच्या काळातील सामाजिक परिस्थितीचे वर्णन प्रस्तुत ग्रंथात करण्यात आलेले आहे.

⊛ (4) तबकाते नासिरी व तबकाते अकबरी :- हे दोन्ही ग्रंथ घोरी वंशाचा इतिहास लिहिण्यासाठी सहाय्यक ठरतात. तबकाते नासिरी या ग्रंथाचे लेखक मिनहाजुद्दीन सिराज आहेत.
तर तबकाते अकबरी हा ग्रंथ निजामुद्दीन अहमद यांनी लिहिला आहे. निजामुद्दीन हा एक विदेशी होता. तो ताजुद्दीन एलडोज, सिंधमध्ये नासीरुद्दीन कुबाचा व अलतमशकडे काही काळ आश्रयास राहिले होते. रझियाच्या संपर्कातही तो काही काळ होता. तबकाते नासिरी या ग्रंथाची रचना त्याने नासिरुद्दीनच्या कारकीर्दीत केली असून तो ग्रंथ त्यांनाच अर्पण केलेला आहे.

Scanned with CamScanner

हा ग्रंथ पूर्वमध्यकालीन भारतीय इतिहासावर प्रकाश टाकतो. या ग्रंथात, हिंदुस्थानात तुर्की राजवटीच्या (१२६०) स्थापनेपासून इ.स. १२६० पर्यंतच्या ऐतिहासिक घटनांची माहिती आढळते. तसेच तत्कालीन मुस्लिम देशाचाही इतिहास या ग्रंथात वर्णन केलेला आहे. अल्तमश व बल्बन या सुल्तानांची या ग्रंथात लेखकाने फार स्तुती केली. या ग्रंथातील घटनाक्रमाची नोंद योग्य रीतीने करण्यात आलेली नाही. असे असले तरी गुलामवंशाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा एक ग्रंथ म्हणून त्याचे महत्व नाकारता येत नाही.

(५) तारीख-ए फिरोजशाही :- झियाउद्दीन बरनी या ग्रंथाचा कर्ता असून तो गियासुद्दीन, मोहम्मद व फिरोजशाह तुघलकाच्या समकालीन होता. त्याने इ.स. १३३८ साली या ग्रंथाची रचना केली असून या ग्रंथात तत्कालीन अनेक विविध घटनांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. नासिरुद्दीन मोहम्मदशाह पासून फिरोजशाह तुघलकाच्या कारकीर्दीच्या पहिल्या सहा वर्षातील घटनांची माहिती या ग्रंथात आढळते. अल्लाउद्दीन खिलजीने केलेल्या प्रशासकीय सुधारणा आणि मोहम्मद तुघलघच्या निरनिराळ्या योजनांची सविस्तर माहिती देण्याचे काम वरील ग्रंथ करतो.

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

*(६) फतवा-ए-जहांदरी :- जियाउद्दीन बरनी हा या ग्रंथाचा लेखक असून महमद गझनीची प्रशासन व्यवस्था या विषयी माहिती ग्रंथ देतो.

*(७) तारीख-ए-फिरोजशाही :- शम्स-ए-सिराज अफीफ हे फिरोजशहाच्या दरबारी आश्रयास होते. त्याने जियाउद्दीन बरनीचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण केले. त्यानेच या ग्रंथाची रचना केली असून या ग्रंथाचे एकूण नऊ भाग पाडण्यात आले. या ग्रंथात फिरोजशहा तुघलकांच्या इ.स १३५७ ते १३८८ पर्यंतचा इतिहास रेखाटण्यात आला असून फिरोजशहाच्या चरित्याचे सुद्धा वर्णन केले आहे. या ग्रंथात सत्य घटना नमुद केलेल्या आहेत. या शिवाय तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीवरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

*(८) अमिर खुसरो यांचे ग्रंथ :- अमीर खुसरो याने अनेक ग्रंथ लिहिले. या ग्रंथाना ऐतिहासिक साधन म्हणून फार महत्व आहे. तो प्रसिद्ध विद्वान असून अल्लाउद्दीन खिलजीच्या दरबारात राजकवी होता. त्यांच्या ग्रंथावर राजकीय प्रभाव स्पष्ट जाणवतो. त्याचे ग्रंथ सुलतानशाहीच्या इतिहासाची महत्वाची साधने आहेत. या ग्रंथात बलबनपासून मुहम्मद तुघलक पर्यंतचा इतिहास रेखाटला आहे.- त्याने लिहिलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे

(I) किरानुस्सादेन :- इ.स. १२८९ साली अमीरखुसरो यांनी या ग्रंथाची रचना केली. केकुबाद आणी बगरा यांच्याभेटी संबंधीचे वर्णन या ग्रंथात आढळते. तसेच त्या काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक परिस्थितीविषयी या ग्रंथात प्रकाश टाकण्यात आला आहे. दिल्ली शहर, तेथील मुख्य भवन, सुलतानाच्या दरबारातील ऐशारामी जीवन, पैशांची उधळपट्टी, संगीत आणी नृत्य या गोष्टींचेही वर्णन या ग्रंथात सांगितले आहे.

(II) आशिका :- या ग्रंथात अमीर खुसरो यांनी अल्लाउद्दीन खिलजीच्या मुलगा खिज्रखान आणी गुजराथच्या नरेश कर्ण याची देवलराणी यांचे प्रेमप्रकरण आणी त्यांच्या विवाहाची माहिती दिली आहे. अलाउद्दीन खिलजींचे आजारपण आणी मलिक काफूर याचा वाढता अन्याय, अत्याचार याचेही वर्णन या ग्रंथात आढळते.

(III) मिफता-उल-फुतूह :- इ.स. १२९१ साली या ग्रंथाची रचना खुसरो यांनी केली असून जलालुद्दीन खिलजीच्या सुरुवातीच्या काळात मिळालेल्या विजयाची माहिती या ग्रंथात आढळते.

(IV) खजाइनुल फुतूह किंवा तारीख-ए-अलाई :- इ.स. १३११ मध्ये या ग्रंथाची रचना करण्यात आली असून य ग्रंथ सुलतानशाहीच्या इतिहासाचे महत्वाचे साधन आहे. या ग्रंथात अलाउद्दीन खिलजींची फार स्तुती केली आहे. अल्लाउद्दीनचे राज्यारोहण, त्याने केलेल्या आर्थिक सुधारणा आणी त्याचे सामाजिक सांस्कृतिक-

धोरण या विषयी माहिती या ग्रंथात आढळते.

(*) (८) **तुघलकनामा** : या ग्रंथात अमीर खुसरो यांनी तुघलक घराण्याची स्थापना आणि शेवट कशा पद्धतीने झाला याचे वर्णन केलेले आहे. तुघलक घराण्याचा इतिहास समजण्यासाठी हा ग्रंथ महत्वाचा आहे.

(*) (९) **फुतुहात-ए-फिरोजशाही** : या ग्रंथाचे लेखन फिरोजशहा तुघलकांनी स्वतः केले. फिरोजशहा तुघलकाचे चरित्र धार्मिक धोरण, प्रशासन व्यवस्था याची माहिती या ग्रंथावरून होते. सुलतानशाहीच्या इतिहासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाला महत्वाचे स्थान आहे.

(*) (१०) **तारीख-ए-मुबारकशाही** : हा ग्रंथ अबुबक्र इसामी यांनी फारसी भाषेत लिहिला आहे. यामध्ये यामध्ये महमद गझनीच्या वंशापासून ते महम्मद तुघलकापर्यंतच्या इतिहासाचे वर्णन केलेले आहे. या ग्रंथास शहनाम-ए-हिंद या नावानेही ओळखले जाते. इसामी यांनी अल्लाउद्दीन खिलजींच्या काळात घडलेल्या सत्य घटनावर आधारीत या ग्रंथाची रचना केली. दक्षिण भारताच्या इतिहासाची महत्वपूर्ण माहिती देणारा हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे.

(*) १०- **फुतुह-उस-सलातीन** :

⊛ ⑪ तारिख-ए-मुबारकशाही :- हा ग्रंथ याहीया बिन अहमद यांनी लिहिला आहे. यामध्ये महमद गझनीच्या वंशापासून ते महम्मद तुघलकापर्यंतच्या इतिहासाचे वर्णन केलेले आहे. इ.स. १३८८ ते १४३४ या कालखंडातील सुलतानशाहीचा इतिहास या ग्रंथात आढळतो. फिरोजशहाच्या मृत्यूनंतर दिल्ली शहराची परिस्थिती कशी होती, तसेच तैमूरच्या आक्रमक हल्ल्यांचा जनतेवर झालेला परिणाम अशा अनेक घटनांचे वर्णन या ग्रंथात करण्यात आले आहे. या ग्रंथावरून सय्यद घराण्याचा इतिहास समजतो.

⊛ ⑫ किताब-उल-रहला :- हे एक प्रवास वर्णन असून मोरोक्को येथील इब्न बतूता हे त्याचा लेखक आहेत. त्याचा जन्म आफ्रिका खंडातील मोरोक्को देशातील टांजियर्स येथे इ.स. १३०४ साली झाला. वयाच्या २२ व्या वर्षी तो जगात भ्रमण करण्यासाठी निघाला. चीन, मलाया, अफगाणिस्थान, खोरासान व सिलोन देशाप्रमाणेच तो भारतात आला. या ठिकाणी आठ वर्षे वास्तव्य केले आणि इ.स. १३५४ साली तो मायदेशी परत गेला. त्यांनी लिहिलेल्या या प्रवासवर्णनपर ग्रंथात महम्मद तुघलकाच्या कारकीर्दीचे वर्णन आढळते. महम्मद तुघलकाच्या दरबारातील वृत्तांत, नियम, रीतिरिवाज अशा अनेक घटनांचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे. तसेच दासप्रथेचाही उल्लेख करण्यात येऊन स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे.

(१३) तारीख-ए-सलातीन-ए-अफगाणा : अहमद यादगार याने सम्राट अकबराच्या काळात या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथावरून लोदी घराणे आणि सूर घराणे विषयी माहिती मिळते.

(१४) मखजाने अफगाणा : या ग्रंथाचे लेखक नियामतुल्ला असून या ग्रंथाची रचना सम्राट जहांगिरच्या काळात करण्यात आली. निरनिराळ्या पठाण राज्यांची आणि लोदी राजघराण्याची माहिती या ग्रंथात आढळते.

(१५) तारीख-ए-दाऊदी : या ग्रंथाचा कर्ता अब्दुल्ला असून या ग्रंथाची रचना सम्राट जहांगिरच्या कारकीर्दीत आली. या ग्रंथात शेरशहाच्या संबंधीत असलेल्या सर्व घटनांचे वर्णन करण्यात आले आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा असून तो बहलोल लोदी ते दाऊदशाहांच्या इतिहासाची माहिती देणारा प्रमुख साधन ठरतो.

(१६) ललित साहित्य : ललित साहित्यावरून सल्तनत काळातील सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीची माहिती होण्यास मदत होते. सल्तनकाळाच्या पूर्वार्धात अधिक ललित साहित्याची निर्मिती झाली नाही परंतु उत्तरार्धात मात्र भरपूर प्रमाणात ललित साहित्य निर्माण झाले. ~~तसेच याच काळात~~ सल्तनत काळात सूफी संप्रदायाचा विकास झाला तसेच याच काळात भक्ती आंदोलनास प्रारंभ झाला. या-

दो

दोन्ही पंथाच्या संदर्भात लिहिण्यात आलेल्या ग्रंथावरून तत्कालीन सांस्कृतिक माहिती मिळते. त्यामध्ये अमीरखुसरो यांचे साहित्य, मलिक मुहम्मद जायसी यांचे साहित्य, नाथ व शिख साहित्य, संत साहित्य, काव्य: या सर्व साहित्यावरून सल्तनतकालीन इतिहासाची माहिती मिळते.

(७) नाणी (मुद्रा) :- पुरातात्विक साधनात नाण्यांना फार महत्व आहे. पुरातात्विक साधनामुळे साहित्यिक साधनास दुजोरा मिळतो. सल्तनत काळात होऊन गेलेल्या विविध सुलतानांनी अनेक प्रकारची नाणी तयार केली. या नाण्यांच्या धातुवरून त्या काळातील आर्थिक परिस्थितीची कल्पना आपणास येते.

(*) (८) इतर साधने :- अरबांनी भारतावर आक्रमणे केली आणि सिंध प्रांत जिंकून घेतला. अरबांच्या सिंध विजयाची माहिती 'तारीख-उल-सिंध' आणि 'मुहम्मद कासीम' या ग्रंथावरून होते. पहिल्या ग्रंथाची रचना मुहम्मद मासूम व दुसऱ्या ग्रंथाची रचना फरिश्ता याने केली. निजामुद्दीन शामी आणि सफुद्दीन याजदी यांनी लिहिलेल्या 'जफरनामा' या ग्रंथावरून तैमूरच्या आक्रमणाची माहिती मिळते. अकबर आणि जहांगीरच्या कारकीर्दीत रचलेल्या 'तारीख खाँ जहानी' व 'तोहफाये अकबरशाही' या ग्रंथावरून अफगाण वंशाचा इतिहास समजण्यास मदत होते.

#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

१५ ७ २०२०

## ब] मुहम्मद घोरी यांची हल्ले :-

पार्श्वभूमी इसवी सनाच्या ७ व्या शतकापासून भारताच्या राजकीय जीवनाच्या ऱ्हासाचा प्रारंभ झाला होता. उत्तरेकडे अनेक छोटीछोटी राज्ये होती आणि त्यांच्यात एकमेकात संघर्ष होते. दक्षिणेतही हीच परिस्थिती होती. अशा अस्थिरतेच्या काळात मुसलमान आक्रमक इस्लामी धर्माचा झेंडा हातात घेऊन आपापल्या आपल्या सैन्यानिशी भारताच्या सरहद्दीवर येऊन धडकले.

मुसलमानांनी संघटीत स्वरूपाची भारतावर पहिली स्वारी इ.स ७१२ मध्ये सिंधवर केली. महमंद बिन कासीमने सिंध प्रांताचा हिंदु राजा दाहिर याला पराभव करून इ.स ७१२ मध्ये अरबांची सत्ता सिंधवर स्थापन झाली. सिंधची स्वारी राजकीय दृष्ट्या काही यशस्वी ठरली नाही. येथे स्थायिक झालेल्या अरबांमध्ये देखील परस्परांत संघर्ष सुरू झाल्यामुळे अरबी सत्तेला तडे जाऊ लागले.

* **तुर्कांची भारतावरील आक्रमणे :-**
नव्यानेच इस्लाम धर्म स्वीकारलेल्या या तुर्कांच्या आक्रमकतेमध्ये काही कारणांमुळे खूपच भर पडली. जगातील सर्वोत्तम असे घोडे त्यांच्याकडे होते. या तुर्कांनी केवळ इस्लाम धर्म न स्वीकारणाऱ्या तुर्की टोळ्यांशीच लढाया केल्या असे नव्हे तर हिंदुस्थानात प्रवेश करून तेथील राजकीय इतिहासाला दिशा दिली.

* (१) **तुर्कांच्या लष्करी सामर्थ्यातील वाढ :-** खुरासान व इराणमध्ये तुर्की लष्करी सामर्थ्याची वाढ होण्यास काही संस्थात्मक घटकांचाही हातभार लागला. यात 'इक्ता' नावाची व्यवस्था सर्वात महत्त्वाची होती. या पद्धतीमध्ये प्रत्येक इक्तेदारास ठराविक प्रदेश वाटून दिला जात होता. आणि त्या प्रदेशातील शेतकऱ्यांकडून राज्याला येणे असलेले सर्व प्रकारचे कर वसूल करण्याची जबाबदारी त्या इक्तेदारावर सोपविण्यात येत होती. इक्त्या-
-च्या वतनाचा संबंधित इक्तेदार अमीर खान;
-च्या पदरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सैन्य ठेवीत असे आणि सुलतानाच्या आज्ञेनुसार हे सैन्य सुलतानाच्या मदतीस पाठवीत असे. सुलतान त्यांना आपल्या इच्छे प्रमाणे कुठेही पाठवू शकत होता. सर्वस्वी सुलतानावर अवलंबून असलेले हे अत्यंत सक्षम घोडदळच पुढे तुर्की सुलतानांच्या

Scanned with CamScanner

नेतृत्वाखाली मुस्लिम सत्तेचा विस्तार करण्यास मुख्यतः उपयुक्त सिद्ध झाले.

* ② तुर्कांची हिंदुस्थानकडे आगेकूच :- या काळात काटक, चपळ, लुटारू सैनिकांच्या केंद्रित सैन्याचे लक्ष परंपरेने सुवर्णभूमी मानल्या जाणाऱ्या हिंदुस्थानकडे कधी वळते हाच केवळ प्रश्न होता.

इ.स. ८७० मध्ये याकूब नावाच्या सरदाराकडून अखेर काबुलिस्तानचा पाडाव झाला असे सांगण्यात येते. याकूब हा शेजारच्या 'सीस्तन' या इराणी प्रांताचा राजा होता. काबुलिस्तानचा राजा यात मृत्युमुखी पडला आणि प्रजेला सक्तीने इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडण्यात आले. अलप्तगीन हा खुरासानमधील सामानी राजाचा एक सेनापती होता. इ.स. ९६३ मध्ये दक्षिण काबुलिस्तानातील गझनीवर हल्ला करून ती ताब्यात घेतली आणि आपण स्वतंत्र शासक असल्याचे जाहीर केले. अफगाणिस्तानातील हिंदु-राजांनी गझनीच्या माजी सामानी-सुभेदाराशी, मुलतान भागातील भट्टी राजघराण्याशी, तसेच बोलन खिंडी पलीकडील मुलतानच्या मुस्लिम अमिरांशी

हात मिळवणी करून या संकटाचा सामना करण्याचा प्रयत्न केला. यासर्वांची हिंदुशाही राजा जयपाल याच्याशी मैत्री करण्याची तयारी होती; कारण गझनीचे राजे त्यांच्या प्रदेशामध्ये गुलामाकरवी हल्ले करून त्यांना त्रास देत होते. तथापि जयपालचा गझनीवरचा हल्ला फसला आणि नंतर त्याने उभारलेली ही दोस्तांची आघाडीही लवकरच ढासळली. अल्पतगीननंतर गझनीच्या राज्यावर आलेल्या सबुक्तगीनने लामगान हा सरहद्दीनजीकचा भाग म्हणजेच काबूल व जलालाबाद-कोयरशाख केला. साधारणत: इ.स ९९०-९९१ च्या दरम्यान जयपालच्या निर्णायक पराभव आला.

* ③ <u>महंमद गझनीचा उदय</u> :- इ.स ~~९९९~~ ९९९ मध्ये गझनीच्या महंमद आला आणि हिंदुस्थानवर दरवर्षी मोहिम काढण्याची शपथ घेतली. भारतावर आक्रमण करणारात गझनीचा महंमद प्रमुख मुस्लिम होय. त्यापूर्वी त्याच्या वडिलाने म्हणजे सबक्तगीनने पंजाबवर चार स्वाऱ्या करून सिंधू नदीच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश काबीज केला होता. त्याने इ.स ९८८ मध्ये पेशावर ताब्यात घेतले होते. महंमद गझनीने इ.स १००० ते १०२६ या काळात भारतावर जवळ जवळ १७ स्वाऱ्या गंगा-सिंधू ~~नदी~~ नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेश-

Scanned with CamScanner

उध्वस्त केला. या स्वतंत्र स्वाऱ्यामुळे महंमद यांना इस्लामी लोकांत मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. खलिफाने त्याचा गौरव केला. मिळालेल्या प्रचंड संपत्तीतून त्याने गझनी अनेक इमारतींचे बांधकाम केले. या संपत्तीच्या जोरावर महंमद गझनी यांनी आपल्या दरबारात अनेक साहित्यकारांना आश्रय दिला. या स्वाऱ्यामुळे त्याचे साम्राज्य बरेच विस्तृत झाले. त्याच्या या आक्रमणांनी इतर मुस्लिमांना आक्रमण करण्याची स्फूर्ती मिळाली. इ.स. १०३० मध्ये महंमद गझनी मरण पावला. त्याच्या मृत्युनंतर जवळजवळ दीडशे वर्षापर्यंत भारतावर मोठे परचक्र आले नाही.

गझनीचा महंमद फक्त लुटमार करणारा होता भारतात सत्ता स्थापन करण्याची राजकीय महत्वकांक्षा बाळगणारा नव्हता. परंतु त्याच्या मृत्युनंतर दीडशे वर्षांनी भारतावर चालून आलेल्या महंमद घोरी मात्र भारतात राजकीय सत्ता स्थापना करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन आला होता.

## घोरींचा उदय व हिंदुस्थानवरील आक्रमण (भारतावरील)

(१) घूर प्रदेशातील घोरींचा उत्कर्ष :- गझनवी साम्राज्य व सेल्जुकी साम्राज्य यांच्या दरम्यानच्या पर्वतरांगांमधील अत्यंत दुर्लक्षित, दुर्गम अशा

घूर प्रदेशामध्ये घोरींचा आलेला उत्कर्ष ही एक अनपेक्षित आणि असाधारण अशी घटना होती. हा प्रदेश इतका दुर्गम होता की, अकराव्या शतकापर्यंत तो ~~मुस्लिम~~ मुस्लिम राज्यांनी वेढलेला मूर्तिपूजकांचा प्रदेश राहिला. बाराव्या शतकाच्या सुरुवातीस महमूद घोरी महमुदाने स्वारी केल्यानंतर या भागाचे इस्लामीकरण झाले.

पूर्वसूरींप्रमाणे घोरींनीसुद्धा खुरासान व मर्व या संपन्न प्रदेशाच्या नियंत्रणासाठी सतत लढाया केल्या. गझनवींप्रमाणे त्यांनाही त्यांनी लादलेल्या प्रचंड करांमुळे खुरासान भागात कधीच लोकप्रियता लाभली नाही आणि त्यामुळे त्या भागात आपली सत्ता कायम राखणे त्यांना खूप अवघड गेले. सेल्जुकींबरोबर ऑक्ससच्या पलीकडील तुर्की टोळ्यांबरोबर त्यांची जी वारंवार युद्धे होती; त्यामुळे त्यांनाही हिंदुस्थानची (भारताची) वाट धरणे भाग पडले.

※② **मुईजुद्दीन मुहंमद गझनीच्या गादीवर :-**

इ.स ११६३ मध्ये गियासुद्दीन मुहंमद हा घूरच्या गादीवर आला. एका तुर्की परंपरेनुसार त्याने आपला धाकटा भाऊ मुईजुद्दीन महंमद अशा प्रकारच्या या विलक्षण समविभागणीमुळे मुईजुद्दीन (महंमद) हिंदुस्थान काबीज करण्यासाठी आपली सर्व ताकद एकवटणे शक्य झाले.

## महंमद घोरींची भारतावरील आक्रमणे :-

इ.स ११७५ ते १२०६ पर्यंतच्या काळात महंमद घोरीने भारतावर अनेक आक्रमणे करून उत्तर भारतावर आपली सत्ता स्थापन केली. पश्चिम भारत व सीमा प्रदेशाजवळील मुलतान येथील शासक इस्माईल या शिया शियापंथीय मुसलमानाचा पराभव करून तेथे आपल्या सुन्नीपंथीय सुभेदारांची नियुक्ती केली नंतर पंजाबचे प्रवेशद्वार समजले जाणारे पेशावर त्याने काबीज केले. लाहोर व सियालकोट (सियालकोट) त्याच्या सत्तेखाली आले. गुजराथच्या राजपूत राजा मूळराज यांच्या तीव्र प्रतिकारामुळे गुजराथवर त्याचे प्रभुत्व प्रस्थापित होऊ शकले नाही. अशा रीतीने सीमा प्रांत व पश्चिम भारतावर आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर व संरक्षणाची योग्य तरतूद केल्यानंतर त्याने आपला मोर्चा मध्य भारताकडे वळविला.

* हिंदुस्थानवरील पाहिली लष्करी मोहीम
* ③
* ११७५ - पहिली लष्करी मोहीम
* ११७८-७९ मध्ये गुजरात मधील नहरवाला येथे आला. परंतु गुजरातच्या राजाने त्याला माऊंट आबूजवळ तराईत पराभव केला. महंमदने आपल्या पराभवानंतर संपूर्ण योजना बदलून टाकली.
* ११७९-८० पेशावर जिंकून घेतले.
* सत्तेखाली
* ११८१ लाहोर स्वारी त्याचवेळी सियालकोट सह पंजाब प्रदेशात आपल्या राज्याचा विस्तार केला. आणि सिंध प्रांताच्या सागरी किनाऱ्यापर्यंतच्या प्रदेशावर आपली सत्ता. अशा रितीने महंमद घोरी आणि आर हिंदुस्थानातील

③ **मध्य भारत काबीज :-** त्यावेळी मध्य भारतात अजमेर, दिल्ली, कनौज, बिहार, बंगाल व बुंदेलखंड ही प्रामुख्याने सामर्थ्यशाली राज्ये होती. ती जिंकण्यासाठी महंमद घोरीने भारतावर हल्ले केले.

* राजपूत राजे यांच्यातील संघर्षाची पार्श्वभूमी तयार झाली.

#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

(२) तराईचे पहिले युद्ध :- अजमेर व दिल्ली येथे चौहानवंशीय पराक्रमी राजा पृथ्वीराज हा सर्वाधिक लोकप्रिय राजा अधिकारावर (गादीवर) होता. महंमद घोरी व पृथ्वीराज यांची गाठ इ.स. ११९१ मध्ये तराईच्या मैदानात पडली. या लढाईत महंमद घोरी पराभूत झाला त्याने कशीतरी आपली सुरक्षा करून गझनी गाठले. पण तराईचा पराभव व त्याचे शल्य महंमद घोरीला स्वस्थ बसू देईना. त्यामुळे पृथ्वीराजावर सूड उगवण्याची जय्यत तयारी करून मोठ्या तयारीनिशी तो पुन्हा पृथ्वीराजावर चालून आला.

(३) तराईचे दुसरे युद्ध इ.स ११९२ :- इ.स ११९२ मध्ये महंमद घोरी व पृथ्वीराज यांच्यात तराई येथे पुन्हा युद्ध झाले. यावेळी महंमद घोरी अत्यंत सावध व जय्यत तयारी निशी असल्यामुळे गाफील राहिलेल्या पृथ्वीराजांच्या सैन्याला त्याला सहज पराभव करता आला. दुर्दैवाने पृथ्वीराज महंमद घोरीच्या हाती सापडला. महंमद घोरीने पृथ्वीराज ठार केले. या विजयामुळे अजमेर व दिल्ली वर घोरींची सत्ता स्थापन झाली. भारताच्या इतिहासात हे तराईचे युद्ध महत्वाचे समजले जाते कारण राजपुतांची शक्ती क्षीण होऊन भारतात मुस्लिम साम्राज्य स्थापण्याचा मार्ग मोकळा झाला होता. तराईच्या विजयानंतर महंमद घोरीच्या स्वामीनिष्ठ गुलाम कुतुबुद्दीन ऐबक याने इ.स ११९२ मध्येच मिरत, दिल्ली, रणथंबोर इत्यादी राज्ये काबीज करून मध्यभारतावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

१९.७.२०२०

(४) पुर्वभारत का बीज :- महंमद घोरीने दिल्ली व अजमेर या ठिकाणी विजय संपादन केल्यानंतर आपला मोर्चा कनौजकडे वळवला. कारण कनोज जिंकल्याशिवाय आपल्या राज्याला पूर्णता येणार नाही असे महंमद घोरीला वाटत होते. कनोज जिंकल्यानंतर महंमद घोरी ~~आपल्या~~ ला बिहार आणि बंगालमध्ये जाणे सुलभ होणार होते. म्हणून इ.स ११९४ महंमद घोरीने कनोजवर स्वारी. कनोज च्या शासक जयचंद राठोडने जय्यत तयार केली परंतु त्याला भारतातील इतर राजांकडून मदत मिळू शकली नाही. इटवा जवळील चंद्रवार या ठिकाणी जयचंद राठोड व महंमद घोरी यांच्यात चुरशीचे युद्ध झाले. या युद्धात जयचंदच्या डोळ्याला बाण लागल्या मुळे घायाळ होऊन तो घोड्यावरुन खाली कोसळला हे पाहून त्याच्या सैन्यात गोंधळ उडाला आणि जयचंदचा पराभव झाला. कनोज विजयानंतर महंमद घोरीने आपला मोर्चा बनारसकडे वळवला.

तेथे मोठ्या प्रमाणात लोकांची कत्तल करुन व मंदिराच्या विध्वंस करुन घोरीने फार मोठी लुट मिळविली. बनारस जिंकल्यानंतर जिंकलेल्या सर्व प्रदेशाचा ताबा कुतुबुद्दीन ऐबक कडे सोपवून महंमद घोरी परत गझनीला गेला.

What makes you happy?
#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

(५) **बंगाल-बिहारचा पाडाव** :- उत्तर भारतात त्यावेळी कुतुबुद्दिन ऐबक (दिल्लीचा सुभेदार) राजपुतांचा बंदोबस्त करण्यात मग्न होता. त्यावेळी महंमद घोरीचा दुसरा सुभेदार बाख्तियार खिलजी हे भारतातील घोरीच्या सत्तेचा पूर्वेकडे विस्तार करण्याचे कार्य करीत होते. इ.स. १२०२ मध्ये बाख्तियार खिलजीने बिहारची राजधानी उदन्तपूर काबीज बिहार सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर त्याने आपला मोर्चा बंगालकडे वळविला. इ.स. १२०५ मध्ये बंगालची राजधानी लखनौतीवर स्वारी करून तेथील राजा लक्ष्मणसेनचा पराभव करून बंगालवर आपली सत्ता स्थापन केली.

(६) **महंमद घोरीचा मृत्यू इ.स. १२०६** :- महंमद घोरी हे गझनी, घोर व भारत अशा विशाल प्रदेशाचे सम्राट बनला. पण या सम्राज्याचे वैभव त्याला फार काळ उपभोगता आले नाही. कारण त्याच्या साम्राज्यात बंडे सुरू झाली. भारतातही काही ठिकाणी बंडे उद्भवली. पंजाबातील खोकर टोळ्यांनी तुर्की राजवटीविरुद्ध बंड पुकारले. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तो पंजाबात आला. कुतुबुद्दीन ऐबकशी त्याने पंजाबमध्ये बोलावून घोरीच्या संयुक्त सैन्याने खोकर टोळ्यांचा पराभव करून गझनीला तो परत जात असतांना झेलम नदीच्या काठी रोहतस या ठिकाणी खोकरांकडून त्याचा खून झाला. अशारितीने इ.स. १२०६ मध्ये महंमद घोरीचा अंत झाला व दिल्लीचे राज्य कुतुबुद्दीन ऐबकाच्या ताब्यात गेले.

Scanned with CamScanner

२९ ७ २०२०

(क) दिल्ली सल्तनतची स्थापना :- (इ.स. १२०६) गुलाम घराणे

पार्श्वभूमी - इ.स. १२०६ मध्ये महंमद घोरीचा खून झाल्यामुळे त्याच्या राज्यात अशांतता निर्माण झाली होती. या अस्थिरतेचा फायदा घेऊन गझनीला ताजुद्दीन एल्डोज याने तर दिल्ली येथे कुतुबुद्दीन ऐबक याने आपली स्वतंत्र सत्ता प्रस्थापित करून स्वतःला सुलतान म्हणून घोषित कुतुबुद्दीन केले. कुतुबुद्दीन ऐबक हा दिल्लीचा पहिला सुलतान बनला असला तरी तो महंमद घोरीचा गुलाम असल्याने त्याने स्थापन केलेल्या सुलतानशाहीला गुलामघराणे या नावाने ओळखले जाते. गुलाम घराणे हे भारतातील सुलतानशाही चे संस्थापक घराणे होय.

हे गुलाम जन्म तुर्क होते. महंमद घोरीच्या गुलाम - कुतुबुद्दीन ऐबक जन्माने तुर्क होता. व कर्तबगारीच्या जोरावर त्याची गुलामगिरीतून मुक्तता झाली होती. अशा या प्रारंभिक तुर्की (गुलाम) सुलतान कुतुबुद्दीन कारकिर्दीचा थोडक्यात राजकीय आढावा पुढील प्रमाणे -

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

२६ ७ २०२०

* कुतुबुद्दीन ऐबक (इ.स. १२०६ ते इ.स. १२१०)

(१) कुतुबुद्दीन ऐबकाचे पूर्वचरित्र / प्रारंभिक जीवन :-

भारतातील गुलामशाहीचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबकांचा जन्म तुर्कस्थान मध्ये एका उच्च तुर्की कुळात झाला. कुतुबुद्दीन दिसायला कुरूप असला तरी कुशाग्र व तल्लख बुद्धीचा होता. लहानपणीच (बालपणी) त्याला काही लोकांनी पळवून नेले व निशापूरच्या एका काझीस गुलाम म्हणून विकले. या काझी फखरुद्दीन ने ऐबकाचे मुलाप्रमाणे पालन करून आपल्या मुलांबरोबर त्याचीही शिक्षणाची व्यवस्था केली. शिक्षणाबरोबरच ऐबकाने युद्धकलेतही कौशल्य संपादन केले. काझीच्या मृत्युनंतर त्याच्या मुलांनी ऐबकाला एका श्रीमंत व्यापाऱ्यास विकले. त्या श्रीमंत व्यापाऱ्याने ऐबकाला गझनीच्या सुलतान महंमदला विकले.

* (२) कुतुबुद्दीन ऐबक महंमद घोरीच्या भारतातील प्रतिनिधी (इ.स. ११९२ ते १२०६) :-

कुतुबुद्दीन आपल्या कर्तबगारीमुळे महंमद घोरीचा आवडता गुलाम बनला होता. ऐबकने घोरी बरोबर अनेक युद्धात भाग घेतला. पृथ्वीराज चौहान बरोबर झालेल्या इ.स. ११९१ व ११९२ च्या तराईच्या लढाईत तो महंमद घोरी बरोबर होता. त्या लढाईत त्याने आपली कर्तबगारी सिद्ध केली. पृथ्वीराज चौहानच्या

पराभवानंतर भारतातल्या जिंकलेल्या प्रदेशावर सुभेदार म्हणून नेमणूक केली. इ. स ११९२ ते १२०६ पर्यंत ऐबकने घोरीचा प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. या काळात त्याने अजमेर, मीरत, दिल्ली, कालिंजर, हंसी, अलिगड, इत्यादी प्रदेश काबीज करून करून भारतात महंमद घोरीचा राज्यविस्तार केला व आपल्या मालकाची मर्जी संपादन केली.

(३) सिंहासन प्राप्ती / राज्यप्राप्ती (२४ जुन १२०६).

आपल्या मृत्युनंतर भारतात कुतुबुद्दीन ऐबकला राज्यप्राप्ती व्हावी अशी महंमद घोरीचीच इच्छा होती. इ. स. १२०६ मध्ये जेंव्हा महंमद घोरीचा खून झाला तेंव्हा त्याच्या राज्यात सर्वत्र गोंधळ निर्माण होऊन ठिकाठिकाणचे त्याचे सुभेदार स्वतंत्र बनले. भारतातही कुतुबुद्दीन ऐबकाने २४ जून १२०६ रोजी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. व तो ~~स्वतःस सुलतान ही पदवी~~ स्वतंत्र शासक म्हणून भारताचा राज्यकारभार पाहू लागला. राज्यप्राप्तीनंतरही त्याने स्वतःस सुलतान पदवी लावून घेतली नाही. पैगंबरवासी महंमद घोरीचाच आपण सेवक आहोत हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याचे काही उद्देश होते.

#HappyCollegeDays

१२ ७ २०२०

* (४) भारतातील सामर्थ्य वृद्धी साठी कुतुबुद्दीन ऐबकने प्रयत्न प्रस्थापित केलेले नातेसंबंध :- मुत्सुद्दी लोक सामर्थ्यशाली घराण्याशी विवाह संबंध जोडून आपली सत्ता व प्रतिष्ठा वाढवित असतात राज्यप्राप्तीनंतर राजकारण पटू ऐबकाने घोरीच्या सामर्थ्यशाली सरदारांशी नातेसंबंध प्रस्थापित केले त्यासाठी गझनीच्या ताजुद्दीन एल्डोजच्या मुलीशी विवाह केला तर आपली कन्या आपला नामांकित गुलाम अल्तमश याला दिली आणि आपली बहिणीचे लग्न सिंधच्या नासिरुद्दीन कुबचाशी लावून दिले. अशा रितीने आपली बाजू बळकट करण्याचा ऐबकने प्रयत्न केला.

⊛(५) कुतुबुद्दीन ऐबक समोरील अडचणी व त्यांचे निवारण :- भारतात इ.स. १२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबकाने स्वतंत्र सत्ता (सुलतानशाही) स्थापन केल्यानंतर त्याच्या समोर अनेक अडचणी होत्या- भारतातील हिंदू शासक घोरीच्या मृत्युनंतर ऐबकला परके समजुन त्यांच्यावर स्वारी करण्याच्या विचारात होते त्यांनी बंडाळ्या सुरु केल्या होत्या, सिंध आणि मुलतानच्या शासक नासिरुद्दीन कुबेचा हा प्रमुख प्रतिस्पर्धी होता. महंमद घोरीच्या मृत्युनंतर ताजुद्दीन एल्डोजने गझनीवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्याला भारतावर आपले वर्चस्व निर्माण करावयाचे होते. अशा अनेक अडचणी कुतुबुद्दीन ऐबक समोर होत्या. ऐबकाने मोठ्या धैर्याने या अडचणींचे निराकरण केले. राज्यप्राप्तीनंतर ऐबकाने वरील अडचणी अत्यंत

Scanned with CamScanner

१९ ७ २०२०

कुशलतेने पराभव करून आपले राज्य शक्तिशाली बनविले.

⊛ (६) कुतुबुद्दीन ऐबकचे विजय :- (१२०६ ते १२१०)

दिल्लीचा सुलतान बनल्यानंतर (राज्यप्राप्तीनंतर) ऐबकने अनेक शत्रुंचे दमण करून आपले राज्य शक्तिशाली बनविले. या काळात त्याला अनेक विजय मिळाले.

(I) ताजुद्दीन एल्डोजचा पराभव :- कुतुबुद्दीन ऐबकचा सासरा व गझनीचा सुलतान ताजुद्दीन एल्डोज पंजाबवर चालून आला. पण ऐबकने एल्डोजचा पराभव केला. एवढेच नव्हेतर गझनीवर स्वारी करून (१२०६) काबीज केली पण ताब्यात ठेवणे अशक्य वाटल्यामुळे त्याने गझनी वर वर्चस्व सोडून दिले.

(II) बंगालवर प्रभुत्व :- दिल्लीचा सुलतान बनल्यानंतर अंतर्गत बंडाळी निर्माण झाली. ~~अंतर्गत~~ अंतर्गत शांतता प्रस्थापित करून कुतुबुद्दीन ऐबकने आपली दिल्लीची सत्ता ~~सुस्थिर~~ सुस्थिर केली. याच वेळी बंगालच्या सुभेदाराने बंड पुकारले होते. या बंडाला बंदोबस्त करून अलीमर्दखान यास बंगालच्या सुभेदार (राज्यपाल) नेमले.

What makes you happy?

#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

## (III) कुतुबुद्दीन ऐबकचे राजपुत धोरण :-

इ.स १२०६ साली कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा सुलतान बनला. त्यापूर्वी महंमद घोरीच्या नेतृत्वाखाली इ.स. ११९२ साली दिल्लीचा ~~राज~~ रजपुत राजा पृथ्वीराज चव्हाणाचा कुतुबुद्दीन ऐबकने पराभव करून दिल्ली गझनी राज्याचा सुभा बनवला. दिल्लीच्या सुभेदार बनल्यानंतर इ.स ११९२ ते १२०६ या काळात दिल्लीच्या आसपास असलेल्या रजपुत राजांचा कुतुबद्दीन ऐबकने बंदोबस्त करून आपली सत्ता सुस्थिर करण्याचा प्रयत्न केला. या काळात त्याला रजपुतांचे पुर्णपणे दमन करता आले नव्हते.

म्हणून दिल्लीचा सुलतान बनल्यानंतर १२०६ ते १२१० या काळातही ऐबकने रजपुत राजांचा पूर्णपणे बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश ~~प्राप्त~~ आले नाही. इ.स १२१० मध्ये पोलो खेळ खेळत असताना घोड्यावरून पडून लाहोर येथे ऐबक मरण पावला.

## ⊛ ⓒ कुतुबुद्दीन ऐबकची योग्यता :-

महंमद घोरीच्या मृत्युनंतर दिल्लीच्या गादीवर गुलाम वंशाची (सुलतान शाहीची) स्थापना करणारा कुतुबुद्दीन ऐबक. कट्टर धर्माभिमानी. तसेच विद्या व कलाप्रेमी सुलतान होता. ~~के~~ हसन-निजामी, व मिनाज-उल-सिराज या मुसलमानी इतिहासकारांनी त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव केलेला आहे. ऐबकाने फक्त चारच वर्ष राज्य केले.

Scanned with CamScanner

१२.७.२०२०

त्यावेळी भारतातील राजकीय परिस्थिती बरीच प्रतिकूल होती. पण पराक्रमाने व राजकारणपटुत्वाने त्यांनी त्यातून मार्ग काढला. ऐबक हा शूर लढवय्या आणि कुशल सेनानी होता. बुद्धीमता, शौर्य, साहस हे त्याचे ~~विशेष~~ विशेष उल्लेखनीय गुण होते. त्याने कर्तबगारीच्या जोरावर आपली गुलामगिरीतून मुक्तता करून घेतली आणि तो इ.स. ११९२ मध्ये महंमद घोरीच्या गझनी राज्याच्या दिल्ली सुभेचा सुभेदार बनला. महंमद घोरीच्या मृत्यूनंतर इ.स. १२०६ मध्ये त्याने दिल्लीला सुलतानशाहीची स्थापना केली.

त्याला दानधर्म करण्याची खूप आवड होती. तो गोर गरीबांना लाखो रुपये दान करत असल्यामुळे त्याला " ~~लख~~ लाखबक्ष" असेही म्हणत असत. ऐबकाला साहित्य आणि कला यांची आवड होती. अजमेर व दिल्ली येथील 'कुव्वत-उल-इस्लाम' आणि 'ढाई दिन का झोपडा' या दोन प्रसिद्ध मशिदी त्याने बांधल्या. ख्वाजा कुतुबुद्दीन या संताच्या ~~स्मृतिप्रीत्यर्थ~~ स्मृतिप्रीत्यर्थ बांधलेला कुतुबमिनार ही त्याच्या कला प्रेमाची साक्ष देतात.

#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

१२.७.२०२०.

डॉ. आशीर्वादीलाल श्रीवास्तव कुतुबुद्दीन ऐबकचे मूल्यमापन करताना म्हणतात," ऐबक हा थोर सेनापती होता. अज्ञात वास आणि दारिद्र्यातून वर आणि प्रतिष्ठेस पोहचणारा नामांकित सैनिक होता. मोगल साम्राज्यात बाबराला जे स्थान द्यावे लागते तेच स्थान सुलतान काळात ऐबकाला द्यावे लागते. स्वतःच्या कर्तबगारीने प्रतिकूल परिस्थितीत सामान्य पदापासून असामान्य असे पद त्यांनी प्राप्त केले.

—*—*—